**<u>ठळक बातम्या</u>**

- स्वप्नं साकारण्यासाठी आणि मुलांच्या सुरक्षित भविष्यासाठी शांततेच्या मार्गावर चालावं असं प्रधानमंत्र्यांचं मणिपूरमधे आवाहन

- विविध योजनांमुळे येत्या ३ वर्षात आदिवासींच्या जीवनात आमुलाग्र बदल घडतील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांचं प्रतिपादन

- राज्यातल्या बारव आणि विहिरींचं जिल्हा निहाय सर्वेक्षण करण्याचा सरकारचा निर्णय

**आणि**

- हाँगकाँग खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी पुरुष दुहेरीत तर लक्ष्य सेन एकेरीच्या अंतिम फेरीत

**<><><><>**

आपली स्वप्नं साकारण्यासाठी आणि मुलांच्या सुरक्षित भविष्यासाठी शांततेच्या मार्गावर चालावं असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मणिपूरमधल्या सर्व गटांना केलं. ते मणिपूरमध्ये एका सभेत बोलत होते. मणिपूर ही आशा आणि विकासाची भूमी आहे, मात्र इथल्या वांशिक हिंसाचाराच्या परिस्थितीत शांततेशिवाय विकास होऊ शकत नाही. म्हणूनच  मणिपूरच्या विकासाकरता जातीय द्वेष, तणाव आणि संघर्ष संपुष्टात आणण्याची गरज असल्याचं ते म्हणाले. केंद्र सरकार कायमच मणिपूरच्या जनतेच्या पाठीशी असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

**- - होल्ड बाईट - मोदी- -**

त्याआधी त्यांनी चुराचंदपूर इथं  सात हजार तीनशे कोटी रुपयांच्या, रस्ते - राष्ट्रीय महामार्ग, जल-मल निःसारण, मालमत्ता व्यवस्थापन सुधारणा, माहिती तंत्रज्ञानविषयक प्रकल्प, काम करणाऱ्या महिलांसाठीची वसतिगृह या आणि अशा क्षेत्रांशी संबंधित १९ विकासकामांचं भूमिपूजनही केलं. या प्रकल्पांमुळे पायाभूत सुविधा आणि आरोग्यसेवांच्या बाबतीत मणिपूरमधल्या जनतेचं जीवनमान सुधारेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. केंद्र

सरकार या प्रदेशातल्या दळणवळणीय जोडणीतल्या सुधारणा आणि विस्तारासाठी करत असलेल्या प्रयत्नांची माहितीही त्यांनी उपस्थितांना दिली.

आपल्या मणिपूर भेटीत प्रधानमंत्र्यांनी काही विस्थापितांचीही भेट घेतली. या विस्थापितांमध्ये आपल्याला आशा आणि विश्वास दिसून आल्याचं त्यांनी सांगितलं.

सकाळी त्यांनी मिझोरमच्या विकासात योगदान देणाऱ्या, नऊ हजार कोटींहून अधिक खर्चाच्या महत्त्वाकांक्षी योजनांचा दूरस्थ पद्धतीनं प्रारंभ केला. यात मिझोरममधल्या बैरागी-सायरंग या पहिल्या रेल्वेमार्गाचा समावेश आहे. सायरंग-दिल्ली राजधानी एक्सप्रेस, सायरंग-गुवाहाटी एक्स्प्रेस आणि सायरंग-कोलकाता एक्स्प्रेस या तीन नव्या एक्स्प्रेस रेल्वेगाड्यांनाही प्रधानमंत्री मोदी यांनी आज हिरवा झेंडा दाखवला.

संध्याकाळी गुवाहाटी इथं ज्येष्ठ आसामी गायक, भारतरत्न डॉ. भूपेन हजारिका यांच्या जन्मशताब्दी कार्यक्रमातही प्रधानमंत्री सहभागी झाले.

**<><><><>**

आदिवासी समाजासाठी केंद्र आणि राज्य सरकार राबवत असलेल्या योजनांच्या माध्यमातून येत्या तीन वर्षांत आदिवासी समाजाच्या जीवनात आमुलाग्र परिवर्तन घडून येईल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र डणवीस यांनी व्यक्त केला आहे. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज यवतमाळ इथं तीनशे पस्तीस कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचं लोकार्पण, भूमिपूजन आणि प्रारंभ झाला त्यावेळी ते बोलत होते. देशभरातल्या आदिवासी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र सरकारनं १ लाख कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे, महाराष्ट्रातही आदिवासी समाजातल्या ५४ हजार कुटुंबांना घरं, नळांद्वारे पाणी, आरोग्यविषयक सुविधा, वसतिगृह अशा अनेक सुविधा वेगानं उपलब्ध करून देण्याचं नियोजन सरकरानं केलं आहे. असं त्यांनी सांगितलं.

केंद्र सरकारच्या आदी कर्मयोगी योजनेअंतर्गत जिल्ह्यातल्या ३६६ गावांची निवड झाली असून, याअंतर्गत राज्यभरातल्या ३० लाख युवकांना प्रशिक्षण दिलं जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

अनुकंपा तत्त्वावरच्या १५ वर्षांपासून रखडलेल्या नेमणुका लौकरच करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी आज केली. सुमारे १५ हजार जणांचा याचा लाभ मिळेल, असं ते म्हणाले.

<><><><>

राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरणाचा प्रारुप आराखडा तयार करण्यासाठी नेमलेल्या एक सदस्यीय समितीच्या कालावधीस १४ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी ही माहिती दिली. पाटणा उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या या समितीचा कालावधी उद्या संपुष्टात येणार होता.

या समितीस अनुसूचित जातींच्या सर्व घटकांचा सखोल अभ्यास करणे, तथ्यांची छाननी करणे, उपवर्गीकरणाची आवश्यकता सिध्द करणे आणि त्यानुसार प्रारुप आराखडा शासनास सादर करण्याचे कार्य सोपविण्यात आलं आहे.

<><><><>

राज्यातल्या बारव आणि विहिरींचं जिल्हानिहाय सर्वेक्षण करण्यात येणार असल्याचं सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार यांनी सांगितलं. शेलार यांनी आज मुंबईत झालेल्या बैठकीत बारव संवर्धन, संरक्षण याचा आढावा घेतला. पहिल्या टप्प्यात जिल्हानिहाय सर्वेक्षण होणार असून दुसऱ्या टप्प्यात याचं दस्तऐवजीकरण होणार आहे.

<><><><>

आरोग्यमंत्री प्रकाश आबीटकर यांनी आज आपल्या नंदुरबार जिल्ह्याच्या दौऱ्यात भुषा पॉईंट इथं तैनात असलेल्या तरंगत्या रुग्णालयाची पाहणी केली. नंतर याच तरंगत्या रुग्णालयातून नर्मदा नदी पार करत काठावरच्या रुग्णांशी त्यांनी संवाद साधला आणि रुग्णसेवेचा आढावा घेतला आहे. तसंच, या रुग्णालयाच्या माध्यमातून अधिकाधिक सुविधा कशा पुरवता येतील याबाबत अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली. या रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांना विमा कवच प्रदान करण्याबाबत विचार करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><>

वस्तू आणि सेवा कर परिषदेनं नुकतंच अनेक क्षेत्रातल्या वस्तू आणि सेवा करात कपात करुन सर्वसामान्यांना दिलासा दिला. जीएसटी कपात झाल्यामुळे अनेक व्यवसायाच्या वाढीसाठीही मदत होणार आहे.

जीएसटी कपातीमुळे पर्यटन क्षेत्रावर होणाऱ्या परिणामाबाबत जाणून घेऊया…

- **- - होल्ड - व्हाईट कास्ट - -**

*(नव्या सुधारणेनुसार हॉटेलमधल्या निवासावरच्या जीएसटीमधे कपात झाली आहे. यामुळे पर्यटकांना परवडणाऱ्या दरात हॉटेल उपलब्ध होतील, आणि पर्यटनाला चालना मिळेल. तसंच हॉटेल, होम स्टे आणि अतिथीगृहामधल्या गुंतवणूकीतही वाढ होईल.*
*त्याचप्रमाणे बस आणि मिनीबसच्या जीएसटी दरातही कपात झाल्यामुळे तिकीट दर कमी होतील. यामुळे पर्यटकांना प्रवास करण्यासाठी तसंच टूर  एँड ट्रॅव्हल्स कंपन्यांना प्रोत्साहन मिळून पर्यटन क्षेत्राला लाभ होईल.)*

**<><><><>**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत उद्या भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना होणार आहे. दुबई इथं होणारा हा रात्री आठ वाजता सुरु होणार आहे.

या सामन्याविरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षनं राज्यव्यापी निषेध आंदोलन करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज मुंबईत बातमीदारांशी बोलताना दिली. माझं कुंकू, माझा देश या आंदोलनाअंतर्गत पक्षाच्या महिला आघाडीच्या वतीनं प्रत्येक गावातून एका डब्यात कुंकवाच्या डब्या एकत्र करून त्या दिल्लीला पाठवणार आहोत असं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला भारत आणि पाकिस्तान क्रिकेट सामन्याला विरोध करण्याचा नैतिक अधिकार नसल्याची टिका शिवसेनेचे खासदार नरेश म्हस्के यांनी केली आहे. अशिया चषकातला हा आंतरराष्ट्रीय सामना असून, याआधीही काँग्रेसची सत्ता असताना तणावाच्या वेळीही दोन्ही देशांमध्ये क्रिकेटचे सामने खेळले गेले असल्याचं त्यांनी मुंबईत बातमीदारांशी बोलताना सांगितलं.

**<><><><>**

हैदराबाद गॅझेट रद्द करण्याच्या मागणीसाठी लातूर जिल्ह्यातल्या वांगदरी इथल्या ग्रामस्थांनी आजपासून साखळी उपोषणाला सुरुवात केली. ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी आज या उपोषणकर्त्यांची  भेट घेतली आणि आपला पाठिंबा जाहीर केला. हैदराबाद गॅझेटचा अध्यादेश रद्द करून ओबीसी समिती आणि मराठा समिती यांना समोरासमोर चर्चेला बोलवावं अशी मागणी हाके यांनी केली.

**<><><><>**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने घेण्यात येणारी ‘महाराष्ट्र शिक्षक पात्रता म्हणजे  टीईटी २०२५’ ही परीक्षा २३ नोव्हेंबर रोजी होणार आहे. इयत्ता पहिली ते आठवीच्या सर्व व्यवस्थापनांच्या आणि सर्व परीक्षा मंडळांच्या शाळांमध्ये शिक्षक सेवक आणि शिक्षक पदासाठी होणाऱ्या या पात्रता परीक्षेचे ऑनलाइन अर्ज येत्या सोमवारपासून भरता येणार आहेत. तीन ऑक्टोबरपर्यंत परीक्षेसाठी हे अर्ज करता येणार आहेत.

<><><>

४३ वर्षांपासून भूमिगत असलेली नक्षलवादी सुजाता ऊर्फ पोतुला पद्मावती उर्फ कल्पना हिनं तेलंगणा पोलिसांसमोर शरणागती पत्करली. आरोग्याच्या कारणांमुळे सुजाताने शरणागती पत्करल्याचं पोलीस महासंचालक जितेंद्र यांनी सांगितलं. सुजाता ही बंदी असलेल्या भाकप माओवादी या पक्षाची केंद्रीय समितीची सदस्य होती. नक्षलवादी चळवळीतला महत्त्वाचा नेते किशनजी याची ती पत्नी आहे.

<><><>

पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी बनवलेल्या प्रारूप प्रभागरचनेवर हरकती आणि सूचनावरील सुनावणी आज पूर्ण झाली. त्यात सर्वाधिक हरकती या प्रभाग रचना करताना नैसगिक सीमा रेषांचे उल्लघन झाल्याचा होत्या. पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी नगरसेवकांची संख्या १६५ असून, ४१ प्रभाग आहेत. त्यापैकी ४० प्रभाग चार सदस्यीय, तर ३८ क्रमांकाचा आंबेगाव-कात्रज प्रभाग पाच सदस्यीय आहे.

<><><>

अहिल्यानगर ते बीड मार्गावर डेमू रेल्वे सेवा १७ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. त्याआधी रेल्वेरुळाची अखंडता, सिग्नल यंत्रणा आणि सुरक्षा मानकांची पडताळणी करण्यासाठी १४, १५ आणि १६ सप्टेंबर रोजी या मार्गावर स्पीड ट्रायल रन घेण्यात येणार आहे. त्यामुळे रेल्वेमार्गाजवळ राहणाऱ्या रहिवाशांना सतर्क राहण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

<><><>

जालना तालुक्यातील खडकतलाव खदानीत पोहायला गेलेल्या दोन तरुणांना आज पाण्यात बुडून मृत्यू झाला. याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

<><><>

हाँगकाँग खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी जोडीनं अंतिम फेरी गाठली आहे.  आज सकाळी उपान्त्य फेरीत या जोडीनं चीन ताइपेच्या चेन चेंग कुआन आणि लिन बिंग वेई जोडीचा २१-१७, २१-१५ असा सरळ सेटमध्ये पराभव केला.

अंतिम लढतीत सात्विक आणि चिराग यांचा सामना लिआँग वेई केंग आणि वांग चेंग जोडीशी होणार आहे.

हाँगकाँग खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत लक्ष्य सेननं पुरुष एकेरीच्या अंतिम स्पर्धेत मजल मारली. त्याने उपान्त्य फेरीत तैवानच्या छोऊ तिएन चेन याचा २३-२१, २२-२० असा पराभव केला.

**<><><><>**

राज्यात काल मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस झाला. तर विदर्भात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडलं.

राज्यात येत्या ४८ तासात कोकण, मध्य महाराष्ट्र  आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी तर मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. या चारही विभागात तुरळक ठिकाणी मेघ गर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यताही वर्तवण्यात आली आहे.

**//<><><><>//**